ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.077
YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal
Oct-Nov -Dec 2022
Vol. 11 No. 4

# शेतकरी आत्महत्या व हरितक्रांती

**डॉ. बाळासाहेब पवार**

*न्यू आर्टस, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज अहिल्यानगर*

***Corresponding Author:* *डॉ. बाळासाहेब पवार***

**DOI - 10.5281/zenodo.21527475**

भारतात शेतकरी व शेतीची समस्या कायम स्वरूपी सुटाव्यात आणि बळीराजा सुखी व्हावा यासाठी ज्या पद्धतीने धोरणे आखणे आवश्यक होते, तशी धोरणे कधीच आखली गेली नाहीत हे वास्तव आहे. स्वातंत्र्या नंतर देशापुढे पहिले संकट उभे राहिले ते अन्नधान्य उत्पन्नाचे यातून मार्ग काढताना अधिक धान्य पिकवा योजने पासून सुरुवात झाली . तेव्हा पासून शेतकरी चुकीच्या धोरणाचा बळी ठरला आहे . देशातील शेतकरी जगण्यापेक्षा शेतकरी नसलेली फरमोठी लोकसंख्या जगावण्याला प्राधान्य देण्यात आले. शेती सुधार नव्हेतर फक्त अन्न धान्य पिकवा हे धोरण राबवले गेले. त्यातून हरितक्रांती नावाचा रासायनिक क्रांतीचा प्रयोग झाला तो थेट जी. एम . जेनेटिक बदल बियाना पर्यन्त आला हा हरित क्रांतीने जागतिकीकरणाच्या काळात शेतकरी आत्महत्ये पर्यन्त आणून सोडला . वरवरची मलम पट्टी सोडता या चार लाख शेतकऱ्यांचे बळी घेणाऱ्या प्रश्नावर मार्ग निघाला नाही. आज ही आत्महत्या सुरूच आहेत.

देशपातळीवर व महाराष्ट्रात अनेकदा मोठी शेतकरी आंदोलने झाली आहेत. शेतकऱ्यांचा सात - बारा कोरा करण्यासाठी सध्या आंदोलन सुरू असताना महाराष्ट्र सरकारने कर्जमाफीची तत्त्वतः घोषणा केली आहे.शेतकरी संप यशस्वी झाल्याचा आनंद वाटला. शेतकऱ्यांना पुन्हा तातडीने पीक कर्ज देणार असल्याची घोषणा झाली. याच्यात बऱ्याच जाचक अटी आहेत त्यामुळे कर्जमाफीचा लाभ किती शेतकाऱ्यांना मिळेल या बाबत शंका आहे म्हणजे शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करा ही घोषणा तशीच राहिली. फक्त पहिले कर्ज माफ झाले.नवीन पुन्हा सातबाऱ्यावर आले. शेतकरी पुन्हा कर्जाच्या दुष्टचक्रात अडकला आहे. म्हणजे प्रश्न 'जैसे थे'च राहिला.

शेतकरी आणि कर्ज त्यानंतर आंदोलन व कर्ज माफी हे सातत्याने सुरू आहे. या सर्व

परिस्थिती चा आढावा घेतला तर खूप सुरुवाती पासून विचार करावा लागेल, हरीतक्रांतीचा जनक मानला जात असलेल्या स्वामिनाथन यांच्या अधिक अन्न पिकवा कार्यक्रमा पासून ही सुरुवात झाली. शेतकऱ्यांना या दुष्कचक्रात ज्यांनी अडकवले त्याच एम.एस. स्वामिनाथनने नव्याने केलेल्या शिफारशी लागू करावी्यात, अशी मागणी करण्याची वेळ शेतकरी नेत्यांवर आली आहे. भारतीय शेतकऱ्यांना या कर्जाच्या चक्रात अडकवणारा शास्त्रज्ञ एम.एस. स्वामिनाथन त्यावर उपाय पण सुचवत आहे. हा खरतरं त्यांचा प्रामाणिकपणा म्हणावा लागेल. सध्या भारतात कोणतेही शेतकरी आंदोलन असेल ते स्वामिनाथन आयोग लागू करा अशी मागणी करत आहेत. अर्थात या शिफारशी शेतमालाला खर्चाच्या आधारावर आधारभूत किमत द्यावी अश्या सिफारशी त्याने नव्याने केल्या आहेत. अर्थात या शिफारशी त्यांनी फार अगोदर करायला पाहिजे होत्या . चार लाख शेतकारींनी आत्महत्या केल्या नंतर त्यांना सुचलेले शहाणपण आहे . विसाव्या शतकाच्या शेवटी व जागतिकीकरण स्वीकारल्या नंतर भारतीय शेती क्षेत्र तेव्हाच अडचणीत येण्यास सुरुवात झाली होती . तेव्हा त्यांना हे लक्षात आले नाही असे नाही. भारतातील शेती व शेतकरी अडचणीत येण्याला जे दोन घटक कारणीभूत आहेत त्याला भारतातील हरितक्रांती च्या नावाने झालेली रासायनिक क्रांती जबाबदार आहे. तेव्हडे जागतिकीकरण पण जबाबदार आहे. या हरितक्रांती ला स्वामिनाथन जबाबदार आहेत. सर्व श्रेय त्यांना दिले जाते तर जगतिकीकरणाचे अरिस्ट रोखण्यासाठी स्वामिनाथन यांनी उपाययोजना सुचवायला पाहिजे होती. त्यांनी जगतिकीकरणाची चर्चा सुरू झाली, तेव्हाच शेती अडचणीत येणार याची त्यांना जाणीव नसेल असे नाही. हे दोन्ही घटक शेतकरी आत्महत्याना जबाबदार आहेत. याची चर्चा पुढे येईल.

१९६० च्या दरम्यान अमेरिकन शास्त्रज्ञ नॉर्मन बोरलॉग व याच एम.एस. स्वामिनाथन यांनी जास्तीत जास्त उत्पादन होण्यासाठी हायब्रिड बियाण्यांचा वापर करण्याची शिफारस केली. याचा उद्देश भारताला अन्नधान्यात स्वयंपूर्ण करणे होता व हा प्रयोग गहू या धान्या बद्दल केला गेला. परंतु अशा प्रकारची हरितक्रांती करताना आपण आपल्या पारंपरिक शेतीला हळूहळू सोडचिठ्ठी दिली. हो हरितक्रांती हायब्रीड बियाणे, रासायनिक खते आणि पाण्याचा प्रचंड वापर यामुळे झाली होती. अर्थात ही त्यावेळची गरज असू शकेल. परंतु या सर्व तंत्रज्ञानाचा अतिशय अतिरेकी वापर केला गेला. याचे भयंकर परिणाम पंजाब, हरियाना व उत्तर प्रदेशात तेव्हाच जाणवू लागले होते. परंतु त्याकडे दुर्लक्ष केले गेले. इंदिरा गांधींच्या गरिबी हटाव

घोषणेने संपूर्ण देश मोहित झाला होता. गरिबांना स्वस्त धान्य देणारी रेशनिंग व्यवस्था देशात प्रचंड लोकप्रिय होती. आजही हीच व्यवस्था शेतीमालाला प्रामुख्याने अन्नधान्याला योग्य किंमत मिळवून देण्यास अडथळा ठरली आहे. ज्यावेळी आपण खुली अर्थव्यवस्था स्वीकारली तेव्हा शेतकऱ्यांची सर्वप्रकारची सबसिडी बंद केली. मात्र स्वस्त धान्य खरेदी मात्र सुरु ठेवली गेली. त्याचा त्रिकोण शेतकऱ्यांसाठी चक्रव्यूह ठरला. अधिक उत्पन्न काढण्यासाठी नकळत खर्च वाढत गेला. परंतु उत्पन्न एकदम वाढल्यामुळे खर्च लक्षात घेतला नाही. धान्याची विक्री किंमत मात्र वर्षानुवर्षे तशीच राहिली. व सबसिडी बंद झाली.

एक निश्चित टप्यावर उत्पादनक्षमता थांबली. परंतु उत्पादन खर्च वाढतच राहिला. त्यामुळे शेती करण्यासाठी कर्ज घेण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली, पूर्वी भू-विकास बँकांचे कर्ज होतेच, परंतु त्याचे प्रमाण आतासारखे नव्हते. ही बँकसुद्धा अशाच कर्जात बुडीत निघाली. त्याच मार्गाने सहकारी बँकांची वाटचाल सुरु आहे हा आर्थिक असमतोल का निर्माण झाला याचा विचार तत्कालीन नेतृत्वाने केला नाही. फार मोठ्या लोकसंख्येच्या पोटाचा प्रश्न मिटवताना शेतकरी तोट्याची शेती करत आहे याकडे लक्ष दिले गेले नाही

शेतकरी कर्ज आणि कर्जमाफी हा प्रश्नच का निर्माण झाला, या प्रश्नांकडे गांभीर्याने न पाहता प्रचंड उत्पादनाच्या मागे धावत शेतकरी कर्जाच्या जाळ्यात अडकला. वापर असताना व त्या प्रमाणात उत्पन्न असताना शेतकरी आत्महत्या करत नव्हता. तो समाधानाने जगत होता. खरेतर ही हरितक्रांतीच्या रुपाने शेतकऱ्यांच्या शेतात त्याच्याच भाषेत 'अवदसा' सुचली असे म्हणावे लागेल. शेतकरी आपल्या घरात असलेले डुरकुल्यात लिंपून सुरक्षित बियाणे वापरत होता. तेव्हा त्याला रासायनिक खतांसाठी खर्च करावा लागत नव्हता. त्याला ती बियाणे वारंवार वापरता येत होती. शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे खरे पड्यंत्र या नॉर्मन बोरलॉग व एम.एस. स्वामिनाथन यांनी कळत न कळत रचले. शेतकऱ्यांच्या घरातले बियाणे सर्वात अगोदर काढून घेतले. त्याला फक्त एकच उगवण क्षमता असणारे हायब्रीड बियाणे घेणे भाग पडू लागले. नंतर यात अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या उतरल्या व भारतातील कृषी विद्यापीठांनी या कारखान्यात सहभागी होत हातभार लावला. कृषी विद्यापीठांचे संशोधन शेतकऱ्यांच्या उपयोगी पडण्यापेक्षा बियाण्यांच्या कंपन्यांच्या उपयोगी पडले. त्याच्या किंमती शेतकऱ्यांच्या कुवतीबाहेर गेल्या, परंतु त्याच्यापुढे दुसरा पर्यायच राहिला नव्हता. त्यामुळे तो हतबल झाला.

या बियाण्यांना लागणारी खते याच कंपन्यांनी बाजारात आणली. याशिवाय उत्पादन शक्यच नव्हते. हा खर्चही आवाक्याबाहेर गेला. ही हरितक्रांती राहिली नाही, तर ही रासायनिक क्रांती ठरली. प्रत्येक वाणाच्या उत्पन्नाला मर्यादा होती. परंतु खर्चाला नव्हती. अशावेळी सरकारी व्यवस्था, शास्त्रज्ञ व शेतकरी हरितक्रांतीच्या भूलभुलैय्यात अडकला. त्याचे व त्याच्या शेतीचे सार्वभौमत्व भांडवलदार व व्यापाऱ्यांच्या हाती देऊन तो स्वतः कर्जबाजारी होत गेला.

शेती तंत्रज्ञान ही भारतीय शेतकरी - पेलू शकला नाही. शेतकरी औजाराशिवाय शेती करु शकत नव्हता. एकट्या पंजाबात लाखो ट्रॅक्टर विकले गेले. प्रत्येकावर कर्ज झाले. या कर्जाची व्यवस्था भांडवलदारांनी बँकांना हाताशी धरून केली होती. त्यामुळे सर्वात प्रथम हरितक्रांती झालेल्या पंजाबात आत्महत्यांनाही प्रथम सुरुवात झाली. ही औजारे विकत घेताना मजुरांचा तुटवडा कारणीभूत ठरला. प्रश्न पडतो प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशात शेतमजूर का मिळत नाहीत?

त्याचा संदर्भ पुन्हा शेतकऱ्यांच्या कमी किमतीत घेतलेले धान्य आणखी कमी किमतीत रेशन दुकानावर उपलब्ध करून देण्याशी आहे. कष्ट न करता अन्नाचा प्रश्न मिटल्यामुळे शेतमजूर मिळेनासा झाला त्यामुळे शेती औजाराची खरेदी व कर्जबोजा वाढला. अशा या दुष्टचक्रात किती कर्जमाफी दिली तरी शेतकरी बाहेर पडू शकत नाहीत. त्यातच नवीन जैवतांत्रिक संशोधन हा स्वतंत्र लेख विषय होईल. मात्र याविषयी कायमचा तोडगा निघावा, यासाठी प्रयत्न न होता तात्पुरती मलमपट्टीत आम्ही खूप आहोत, हे दुर्दैवच म्हणावे लागेल.

**संदर्भ:**

१) कुंजीर विजय, (२००८) "भारतीय शेती वाटचाल आणि आव्हाने", Unique Bulletin May 2007, Vol-12, No.-2 Pune Page 33 to 35.
२) ढवळे अशोक, "शेतकऱ्यांच्या आत्महत्या चिंतन व उपाय", सुमेरू प्रकाशन, डोंबिवली, पृष्ठ क्र.४७ ते ५५.
३) गायकवाड मुकुंद, (२००८), कर्जमाफी झाली पण, दैनिक एकमत, दि. १-०३-२००८, लातूर.
४) जाधव नरेंद्र, (२००८), शेतकरी आत्महत्या संदर्भातील पॅकेज मूल्यमापन एक सदस्यीय समितीचा अहवाल.
५) बडगुजर चिंतामण, (आवृत्ती २००६) मनोविकृत मानसशास्त्र, महालक्ष्मी पुस्तकालय, कोल्हापूर, पान १४१.

६) Durkheim, Emile (1897), "Suicide: A Study In Scicology," Free Prees Hlenocoe..

७) Ken Morrison (1995), "Marx, Durkheim, Wheber " Sage Publication, New Delhi, London, P.P. 163-182.

८) Shiva Vandna and Jafri, (2009) "Seeds of Suicide", Research Foundation For Science Tech. and Ecology, New Delhi.

९) रघुवंशी राजेश (२००२), म. फुले शेतकऱ्यांचा असूड आणि इशारा, राजेश प्रकाशन, पुणे, पृ.क्र. ५८.

१०) Acharya S.S. (2007), State The Indian Farmer' A Millenum Study 27 vol + CD-Ram Dept. Agri a Co-oprative Ministry, Govt. of India, New Delhi.

११) दांडेकर अजय (२००५)," शेतकऱ्यांच्या आत्महत्या व ग्रामीण कंटाळपण" समाज प्रबोधन पत्रिका, पृ.क्र. १०९.

१२) बोकरे दिवाकर, (२००७) 'शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबायच्या कशा?' डायमंड पब्लिकेशन, पुणे, पृ.क्र. ३०.

१३) ढवळे अशोक (२००७), शेती क्षेत्रातील अभूतपूर्व अरिष्ट व उदारीकरणाचा विदारक परिणाम, सुमेरू प्रकाशन, डोंबिवली, मुंबई, पृ.क्र. ४७.

१४) नॅशनल सॅम्पल सर्व्हे क्र. ४९८ (२००५)

१५) दुभाषी प्रभाकर (२००६), जागतिकीकरण, उदारीकरण आणि अर्थकारण, विद्या प्रकाशन, पुणे, पृ.क्र. ८८-८९.